‘Research Journey’ International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue I– Emerging Trends & Issues in Research & Development
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015)
ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

# लोकसाहित्य: संकल्पना आणि स्वरूप

डॉ. रामदास सर्जेराव रसाळ
मराठी विभाग प्रमुख
दौंड तालुका कला व वाणिज्य महाविद्यालय,
दौंड, जि. पुणे.
मो.नं.९८२२६५६५९५

## लोकसाहित्याची संकल्पना –

‘लोकवार्ता, ‘लोकज्ञान’ लोकयान, लोकविद्या, लोकसंस्कृती व लोकसाहित्य. श्री. जे. एल. मिश म्हणतता, ‘समाजातील मागस लोकसमूहात प्रचलित असलेल्या परंपरा, रूढी, लोकविश्वास, लोकोत्की, लोककथा, लोकगीत, म्हणी, लोककला, इत्यादी बाबींचा समावेश लोकवार्तात (Folklore) केला जाऊ शकतो’ हिंदी लोकसाहित्य हा शब्द प्रामुख्याने मौखिक शाब्दाविष्कारासाठी म्हणजेच लोककला, लोकगीत, लोककथागीत, उखाणे, म्हणी म्हणजेच Folk literature साठी लोकसाहित्य शब्द प्रचलित असल्याचे दिसते.

महाराष्ट्र लोकसाहित्यमालेच्या पहिल्या पुष्पात चिं. ग. कर्वे यांनी Folklore साठी लोकसाहित्य हा शब्द सूचित केला आहे. त्यावरूनही Folklore ची व्याप्ती आणि या इंग्रजी श्शब्दाला मराठीत दिलेला शब्द अधिक सार्थ वाटतो. तेव्हा लोकसाहित्यात लोककथा, लोकगीते, उखाणे, म्हणी इत्यादी मौखिक शाब्द आविष्काराबरोबरच जुन्या काळच्या लोकसमजुती, लोकश्रध्दा, लोकविश्वास, लोकभ्रम, आचार–विचार, रूढी–प्रथा, विधी–विधाने, जादू–टोणा, लोककला, पारंपारिक व्यवसाय, अशा अनेक बाबींचा समावेश असतो. लोकसाहित्याच्या पाश्चिमात्य अभ्यासकांनी पारंपारिक जीवनपध्दतीतील अशा अनेक बाबींचा समावेश थ्वसासवतम मध्ये होतो असे स्पष्ट केलेले आहे.

लोकसंस्कृतीतील ‘लोक’ हे सर्वसामान्य जन असून, (सर्वसामान्य लोकसमूह) निसर्गाला अधिक जवळचा, निसार्गाच्या सहवासात राहणारा, नैसर्गिक जीवन जगणारा, कृत्रिमतेपासून तसेच सुसंस्कृत किंवा सुधारलेल्या वातावरणापासून दूर राहणारा शहरी संस्कृतीपासून अलिप्त असलेला आणि आदिम अवस्थेला जवळ असणारा लोकसूह असतो. अशा ‘लोकां’चे विशेष डॉ. कुंजबिहारी दास पुढीलप्रमाणे करतात. “The people that live in more or less primitive conditions out side the sphere of sophisticated influeces” तेव्हा अशा शहरी संस्कृतीपासून दूर असलेल्या, स्वाभाविक जीवन जगणा–या लोकांची सस्कृती म्हणजे लोकसंस्कृती, त्यांचे साहित्य किंवा जीवन जगण्याची पध्दती किंवा त्यांच्या लोकमानसातील कृती–उत्की म्हणजे लोकसाहित्य/लोकसंस्कृती आणि त्यांचा मौखिक रूपातील शाब्द आविष्कार म्हणजे लोकवाङ्मय, निसर्गाशी जवळीक साधणारे, स्वाभाविक जीवन जगणारे हे लोक म्हणजेच ‘लोकृदर्शने’ होत.

तेव्हा आर्येतर लोकसमूहाची जीवन वैशिष्ट्ये परंपरेने जतन करीत आलेल्या लोकसमूहास आज लोक म्हटले जाते. लोकसंस्कृती, लोकसाहित्य यातील ‘लोक’ आता समस्त लोकात राहूनही आपल्या परंपरेने आपले स्वतंत्र अस्तित्व दर्शवितात. पारंपारिक जीवन जगणारा, आपल्या समुदायाचे पारंपारिक विशेष जतर करणारा लोकसमूह म्हणजे ‘लोक’ असा अर्थ आज ‘लोक’ या संज्ञेने सूचित होतो.

साहित्यशास्त्रात साहित्य हा शब्द काव्य, नाट्य, कथा यासारख्या वाड:मयासाठी किंवा काव्यमीमांसेसाठी उपयोगात आणला जातो. साहित्य म्हणजे वाड्मय असा अर्थ लोकसाहित्यातील 'साहित्य' या शब्दासाठी येथे अभिप्रेत नाही. तर 'साहित्य' म्हणजे सामुग्री असा अर्थ लोकसाहित्यातील 'साहित्य' या शब्दाला अभिप्रेत आहे. दैनंदिन जीवनात साहित्य हा शब्द आपण व्यापक अर्थाने वापरतो. साहित्य म्हणजे सामुग्री. घरकामाचे साहित्य, गवंड्याचे साहित्य, सुताराचे साहित्य, शेतक—याचे साहित्य, स्वयंपाकाचे साहित्य किंवा घरातील साहित्य म्हणजेच साधन— सामुग्री अर्थ आपल्याला अभिप्रेत असतो. 'लोकसाहित्य' या पारिभाषिक शब्दातील 'साहित्य' हा शब्द केवळ वाड्मयसुचक नसून तो साधन—सामग्री या अर्थाचा आहे. तो लोकसाहित्याची व्याप्ती सूचक असा आहे.

शिवाय Folklore मध्ये (लोकसाहित्यात) केवळ कथा, गीत, उखाणे, म्हणी यासारखे वाड्मय असते असे नाही. तर या मौखिक वाड्मायाबरोबरच अनेक बाबी असतात ज्यांचा समावेश आपल्याला वाड्मयात करता येत नाही. लोकविश्वास, लोकश्रध्दा, विधी, सण—उत्सव, आचार—विचार, रूढी – प्रथा, विविध कला, जादू—टोणा यासारख्या बाबी Literature मध्ये येत नाहीत. त्या lore मध्ये येऊ शकतात. थोडक्यात, लोकसाहित्य या पारिभाषिक शब्दातील 'साहित्य' हा श्शब्द केवळ वाड्मय सूचम नसून 'साधन— सामुग्री' अशा अर्थाचा म्हणून अधिक समर्पक वाटतो. त्याचा असाच अर्थ प्रस्तुत ग्रंथात स्वीकारला आहे.

पंरपरेने चालत आलेली लोकजीवनपध्दती म्हणजे लोकसाहित्य, लोकजीवनात कित्येक श्शतकांपासून परंपरेने चालत आलेल्या, प्रचलित असलेल्या सर्व बाबींचा समावेश लोकसाहित्यात होतो. परंपरेने चालत आलेल्या विधी, रूढी—प्रथा, व्यवसायाचे ज्ञान आणि कौशल्य, लोककला, उत्सव, लोकश्रध्दा व मौखिक शाब्दाविष्कार अशा काही बाबींता उल्लेख या संदर्भात करता येईल. परंपरेने चालत आलेल्या लोकसमूहाच्या जीवनातील बाबी वस्तूरूप, दृश्यरूप आणि मनोमयरूप अशा स्वरूपाच्या असतात या बाबींना या लोकजीवनात अनन्यसाधारण महत्व असते. त्यामागे परंपरा असतात आणि मुख्य म्हणजे त्यांना लोकमानसात महत्वाचे स्थान लाभलेले असते. लोकमानसाच्या कृती—उक्तीतून या बाबी जीवन जगताना आविष्कृत होत असतात. याचाच अर्थ असा की, लोकसाहित्य संपूर्ण पारंपारिक जीवनाला व्यापणारे असते.

समाजजीवनात परंपरेने चालत आलेल्या या जीवनविशेषांचा, सांस्कृतिक विशेषांचा किंवा या पारंपारिक पध्दतीने जगण्याचा अभ्यास करणा—या पाश्चिमात्य देशातील तसेच भारतातील लोकसाहित्याचे स्वरूप—विशेष स्पष्ट करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यातून लोकसाहित्याचे अभ्यासक्षेत्र विकसित होत गेले. लोकसाहित्याचे अनेक पैलू प्रकाशात येऊ लागले. लोकसमूहाच्या पारंपारिक जीवनपध्दतीचा अनेक दृष्टकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न होऊ लागला. त्याच्या या अभ्यासातून लोकसाहित्य म्हणजे काय? याचे उत्तर सापडू शकते. लोकसाहित्याच्या पाश्चिमात्य व भारतीय अभ्यासकांनी लोकसाहित्याच्या स्वरूप विशेषोंविषयी मांडलेल्या विचारांचा परामर्श घेऊन लोकसाहित्य म्हणजे काय? लोकसाहित्यात कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो याची चर्चा प्रस्तूत भागात केली आहे.

श्रीमती शार्लट बर्न यांनी आपल्या 'द हॅंडबुक ऑफ फोकलोर' या पुस्तकात लोकसाहित्यात (Folklore) कोणकोणत्या बाबींचा समावेश करता येतो याची चर्चा करताना म्हटले आहे, ''परंपरेने चालत आलेले जीवन जगणा—या समाजातील लोकविश्वास, लोकश्रध्दा, आचार—विचार, रूढी—प्रथा, कथा, गीत इत्यादींचा समावेश लोकसाहित्यातच होतो''

१८७८ साली इंग्लंडमध्ये स्थापन झालेल्या ‘फोकलोर सोसायटी’ साठी अभ्यास करणारे सर जॉर्ज लॉरेन्स गॉम यांनी लोकसाहित्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगितले आहे. आदिम काळापासुन चालत आलेल्या चाली–रिती, समजूती, पारंपारिक कथने, लोककथा, लोकगीत, स्थानिक कथा, विधीविधाने, उत्सव, निरनिराळे खेळ, जादूटोणा, ज्योतिष, परंपरेने चालत आलेल्या क्रिया, आडाके, तोटके, भ्रम, लोकोत्की इत्यादींचा समावेश लोकसाहित्यातच होतो. वर्तमान समाजजीवनात या समजुती, चालीरीती, रूढी–प्रथा, लोकविश्वास सजिवावशेष रूपाने अस्तिवात असतात. या सर्व बाबींचा अभ्यास लोकसाहित्याच्या क्षेत्रातच होतो. लोकसाहित्याच्या विविध अंगांचा अभ्यास करणारा अमेरिकन अभ्यासक अलेक्झांडर क्रॉप यांनी आपल्या The Science of Folklore ग्रंथात लोकसाहित्यात लोकजीवनातील कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो.

लोकसाहित्याचे स्वरूप–विशेष स्पष्ट करताना लोकसाहित्य विशारदांनी लोकसाहित्याविषयी आपली मते मांडली, व्याख्या केल्या. त्यांच्या या प्रयत्नातून लोकसाहित्याचे स्वरूप बऱ्याच प्रमाणात स्पष्ट होते. लोकसाहित्य विशारदांच्या या संदर्भातील मतांचा, व्याख्यांचा थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे. मारियस बार्डी या लोकसाहित्य अभ्यासकाने परंपरा आणि परिवर्तनशिलता ही लोकजीवनाची तत्वे लक्षात घेऊन लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते लोकजीवनातील पारंपारिक व्यवसायाचे ज्ञान व कौशल्य, लोकजीवनातील रूढी–प्रथा, मौखिक परंपरेने प्रचलित असलेली गीते, कथा, लोकोक्ती, नृत्य–खेळगीते व उत्सव इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात करता येतो. या बाबींचा लोकजीवनात प्रचलन राहण्यासाठी विशेष किंवा जाणीवपुर्वक अभ्यासाची आवश्यकता नसते तर या बाबी लोकजीवनात प्रत्यक्ष कृतीने, मौखिक शाब्द आाविष्काराने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येत असतात. त्यात प्रत्येक पिढीत स्वाभाविक बदल होत असतो. असे ही मत मारियस बार्डी यांनी या संदर्भात व्यक्त केले.

लोकसाहित्य हि संज्ञा, या संज्ञेतील लोक आणि साहित्य या शब्दांना प्राप्त झालेला विशिष्ट अर्थ लोकसाहित्याच्या स्वरूपाची कल्पना देउ शकतो. तसेच लोकसाहित्याच्या अभ्यासकांन सांगितलेली लक्षणे, लोकसाहित्याची व्याप्ती आणि केलेल्या व्याख्या यांच्या आधारे लोकसाहित्याचे स्वरूप–विशेष लक्षात येतात.

पारंपारिक लोकजीवन पध्दती म्हणजे लोकसाहित्य किंवा लोकमानसातील कृती–उक्तींचा अविष्कार म्हणजे लोकसाहित्य. लोकसाहित्याची ही व्याख्या लोकसाहित्याचे स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करणारी आहे. पारंपारिक जीवनपध्दतीत म्हणजेच लोकसाहित्यातील काही बाबी, काही विषय पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. लोकविश्वास, लोकश्रध्दा, लोकसमजुती, लोकभ्रम, लाकोक्ती

२. आचार–विचाार, रितीरिवाज, रूढी–प्रथा

३. विधी–विधाने, सण–उत्सव व्रत–वैकल्ये

४. निसर्गातील दैवी शक्तीचे स्पष्टीकरण

५. निसर्गातील दृश्यांचे, घटनांचे लावलेले अर्थ.

६. पारंपारिक व्यवसाय व कौशल्ये

७. परंपरेशी नाते सांगणा–या वस्तू–वास्तू

८. यंत्र, मंत्र, तोडग, जादू टोणा

९. वनस्पती, नक्षत्रे, खनिज, प्राणी इत्यादी विषयीचे 'लोका'ना असलेले ज्ञान.

१०. लोकनृत्य, लोकनाट्य, लोककला इत्यादी कला.

११. मनोरंजनाचे–खेळाचे प्रकार

१२. लोककथा, लोककथागीते, लोकगीते, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार इत्यादी कलात्मक शब्द अविष्कार.

स्थूलमानाने वरील बाबींचा समावेश लोकसाहित्यात करता येतो. लोकसाहित्यातील वरील विषय पाहिले तर पारंपारिक लोकजीवनाला लोकसाहित्य व्यापते हे लक्षात येते.

लोकसाहित्य हा त्या त्या लोकसंस्कृतीचा एक स्वाभाविक प्रवार असतो. जेव्हा एखाद्या लोकसमूहाची लोकसंस्कृती लोकश्रध्दा, आचार–विचार, रूढी–प्रथा, रिती–रिवाज, कथा, गीत, नृत्य, संगीत, कला इत्यादी पारंपारीक माध्यमातून अभिव्यक्त होते तेव्हा या माध्यमांना लोकसाहित्याचे रूप लाभते.

लोकसाहित्याची निर्मिती लोकजीवनात होते व लोकसाहित्यातून जीवनाला आकार येत असतो. त्यातुनच पुढील जिवनाची जगण्याची पध्दती सिध्द होत असते. जीवन जगणा–या लोकसमूहाला जीवन विशेषांचे एक वेगळेपण प्राप्त होत असते. लोकसाहित्याच्या जडणघडणीत लोकजीवनाचा महत्वाचा वाटा असतो तसेच लोकजीवनाला आकार देण्यात लोकसाहित्यातही महत्वाचे ठरते. लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच्यातील परस्पर संबध अतूट असतात. त्यामुळे लोकजीवनाचा अभ्यास करण्याचे एक महत्वाचे स्थान म्हणजे लोकसाहित्य असे म्हणता येते.

लोकसाहित्य 'लोकां'चे असते, समूहाचे असते. त्यात व्यक्तीत्वाचा अभाव असतो. लोकजीवनातील एखादे तत्व, एखादी बाब, परंपरा, प्रथा, आचार–विचार लोकसमुहारने स्वीकारून त्यास मान्यता दिली तरच त्याचा समावेश लोकसाहित्यात होतो. यादृष्टीने लोकसाहित्याच्या निर्मितीत आणि प्रचलनात लोकसमूहाचा मोठा वाटा असतो याचाच अर्थ लोकसाहित्य हे समूहनिर्मित असते. वर उल्लेखिलेल्या परंपरा समाजाच्या समूहाच्या असतात. व्यक्तींच्या त्या असत नाहीत.

१. लोकसाहित्य निर्मिती समूहात होत असते. हा लोकसमूह परंपरागत जीवन जगत असतो.

२. लोकसाहित्याच्या निर्मितीत आणि प्रचलनात परंपरा महत्वाची भूमिका करत असते.

३. लोकसाहित्याचे प्रचलन, संक्रमण एका पिढीपासून दुस–या पिढीपर्यंत स्वाभाविकपणेच होत असते.

४. शब्द, वस्तू आणि कल्पना रूपातून लोकसाहित्याचा अविष्कार घडत असतो.

५. लोकसाहित्य मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते.

६. लोकसाहित्य हा त्या लोकसमुहाच्या जीवन जगण्याचा अविभाज्य भाग असते.

७. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

लोकसाहित्याचे अनेकविविध पैलू प्रकाशात आले. लोकसाहित्याचे संकलन, वर्गीकरण आणि त्याचा शास्त्रीय अभ्यास करण्याच्या प्रयत्नातून लोकसाहित्याच्या विशाल क्षेत्राची दालने लोकांपुढे उघडली गेली कथा, गीत, उखाणे व म्हणी म्हणजेच लोकसाहित्य ही संकल्पना दूर होवून पारंपारिक लोकजीवन पध्दती म्हणजे साहित्य असे व्यापक स्वरूप लोकसाहित्य विशारदांनी स्पष्ट केले. पारंपारिक लोकजीवनाच्या सर्व माध्यमातून होणा–या अविष्कारांचा समावेश लोकसाहित्यात होत असल्याने लोकसाहित्याची व्याप्ती एकूणच पारंपारिक लोकजीवनाला वापरणारी आहे.

पारंपारिक लोकजीवनात व्यक्ती जन्मापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंत विविध अवस्थात जे विधी केले जातात, जसे पाचवीचा किंवा सटीचा पूजाविधी, नामकरण विधी, जावळ काढण्याचे विधी, मुलगी असल्यास ऋतूप्राप्तीचा विधी, लग्नविधी, अत्यंविधी, तेराव्याचा विधी अशा सर्व विधींचा समावेश लोकसाहित्यात होतो. याशिवाय कौटूंबिक, सामाजिक, धार्मिक स्वरूपाच्या अनेक विधी लोकजीवनात परंपरेने पाळल्या जातात त्यांचाही समावेश लोकसाहित्यात होतो. लोकसाहित्याची व्याप्ती सूचित करण्यासाठी येथे लोकजीवनातील फक्त विधी आचरणाचे उदाहरण दिले आहे. अशा अनेक बाबी लोकजीवनात परंपरेने प्रचलित असतात. आचार—विचार, रूढी—प्रथा, सण—उत्सव, लोकविश्वास, पारंपारिक व्यवसाय, कला, कथा, गीत अशा विविध माध्यमातून लोकजीवनाचा अविष्कार घडत असतो. त्यातून लोकसाहित्याचे क्षेत्र विकसित होत जाते.

लोकसाहित्याचे क्षेत्र विस्तारीत असल्यामुळे, समाजजीवनाचा विविध अंगाने अभ्यास करणा—या अभ्यासकांना लोकसाहित्यातून महत्वपूर्ण सामुग्री मिळते. लोकसाहित्याच्या आधारे समाजशास्त्रज्ञ प्राचीन समाजजीवन विशेषांचा अभ्यास करू लागले आहेत.

महाराष्ट्रातील लोकसाहित्याचे प्रसिध्द अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्याच्या व्याप्तीची विस्तृत चर्चा करून लोकसाहित्याच्या चार विभागात समावेश केला आहे ते विभाग असे.

१. मौखिक अविष्कार

२. भौतिक संस्कृती

३. लोकरूढी, विधी समजुती इत्यादी

४. प्रयोगसिध्द लोककला.

लोकसाहित्यात परंपरेने चालत आलेल्या लोकजीवन विशेषांची डॉ. प्रभाकर मांडे यांनी वरीलप्रमाणे केलेली विभागणी लोकसाहित्याची एकुण व्याप्ती दर्शविणारी आहे. लोकसाहित्याच्या—लोकजीवनाच्या या विभागणीचे स्वरूप आणि त्यात समाविष्ट होणा—या बाबी पुढीलप्रमाणे आहे.

पारंपारिक लोकजीवाचा मौखिक शाब्द अविष्कारात कथा, गीत, कथागीत, उखाणे, म्हणी व वाक्प्रचार यासारख्या लोकवाड्:मयाचा समावेश होतो. लोकसाहित्यातील मौखिक शाब्द अविष्काराचा हा विभाग बराच मोठा आहे. पारंपारिक लोकजीवनात, त्या जीवन जगण्याचा एक स्वाभाविक भाग म्हणूनच हे शाब्द अविष्कार घडतात. कौटूंबिक, सामाजिक व धार्मिक विधींच्या निमित्ताने लोकगीतांची निर्मिती होते. त्याचप्रमाणे श्रमपरिहारासाठीही पारंपारिक लोकजीवनात लोकगीतांची निर्मिती होते. नृत्य खेळाला साथ म्हणून ही गीते स्वाभाविकपणे निर्माण होतात. तर निती उपदेश, धर्मविधी, निसर्ग दृश्याचे स्पष्टीकरण, व्रत—वैकल्ये इत्यादींच्या प्रसंगातून कथात्मक वाड्:मयाची निर्मिती होते. जीवन जगताना लोकांना आलेले अनुभव म्हणीतून सुत्रबध्द होवून अविष्कृत होतात. असे स्वरूप या मौखिक अविष्कारांचे असते.

पारंपारिक लोकजीवनात प्रचलित असलेल्या रूढी—प्रथा, रितीरिवाज, विधी त्या लोकजीवनातील कुटूंबाच्या, जाती—जमातीच्या, समूहाच्या असतात. या रूढी—प्रथांच्यामागे, विधी आचारणामागे लोकमानस कार्यप्रवण असते. यामागे काही श्रध्दा असतात. काही समजुती असतात. आणि त्यांना लोकजीवनात परंपरेने एक आगळे—वेगळे स्थान असते. सटीची

ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

पुजा, नामकरण विधी, लग्नविधी, मर्तिकाचा विधी, तेराव्याचा विधी, बाहेर बाधा होवू नये म्हणुन केल्या जाणा—या कृती, जादू—टोणा, करणी, भानामती इत्यादींच्या मागे पारंपारिक लोकसमूहाच्या काही समजूती असतात. या समूतींचा, लोकविश्वासांचा आणि त्यानूसार केल्या जाणा—या कृतींच्या मागे परंपरा असते. परंपरेनेच त्या लोकजीवनात प्रचलित असतात.

सण—उत्सव, जत्रा—यात्रा या प्रमाणेच गावात साजरे केले जाणारे सामूदायिक उत्सव, विधी आचरण, ग्रामदैवतांची कृपा संपादन करण्याचे विधी, त्यांच्या उपासना पध्दती, त्यांच्याविषयी असलेल्या लोकमनातील श्रध्दा, भय यातून केले जाणारे नवस—सायास, व्रत—वैकल्ये अशा असंख्य बाबी लोकजीवनात परंपरेने प्रचलित असतात. लोकमनावर त्यांचा पगडा असतो. या सर्व बाबींचा समावेश लोकसाहित्याच्या या विभागात होता.

लोकसाहित्यातील या विभागाचे वैशिष्ट्ये म्हणजे रूपातील शाब्द अविष्कार आणि भौतिक संस्कृती यांच्यापेक्षा हा विभाग वेगळा असला तरी या दोन्ही विभागातील बांबीशी त्यांचा जवळचा संबध असतो. विधी आचरणामागे लोकश्रध्दा असते तर प्रत्यक्ष विधीच्या मांडणीत, विधी साजरा करण्यात भौतिक वस्तुरूपाला प्राधान्य येते तसेच विधी आचरणाचाच एक भाग म्हणून मौखिकरूपात गीत, कथा, कथागीत यासारख्या लोकवाड्:मयाचा अविष्कारही घडविल्या जातो. असे निकटचे संबध लोकसाहित्याच्या त्या विभागात असतात. त्यामुळे त्यांना एकमेकांपासून वेगळे काढणे अशक्य ठरते.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्याचा केलेला आणखी एक विभाग म्हणजे प्रयोगसिध्द लोककलांचा performing folklore हा होय. लोकसाहित्याच्या या विभागात परंपरेने लोकजीवनात अविष्कृत होणा—या लोककलांचा समावेश होतो. लोकजीवनात निरनिराळ्या विधी आचरणाच्या निमित्ताने होणारी लोकनृत्ये, खेळ म्हणून खेळली जोणारी नृत्य—खेळ तसेच मनोरंनासाठी केली जाणारी लोकनाट्ये, लोकसंगीत, सण—उत्सव—विधी प्रसंगी भिंतीवर रेखाटली जाणारी चित्रे, चित्रकथींच्या परंपरेतील चित्रपट्टीका, घरापूढील रांगोळी, वस्त्रांचा काशिदा इत्यादी कला लोकजीवनात परंपरेने आपले विशेष दर्शवित असतात.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्याच्या केलेल्या वरील चार विभागांत पारंपारिक जीवनातील ब—याच बाबींचा समावेश झालेला आहे. त्यांनी केलेले हे विभाग लोकसाहित्याचे विस्तारीत क्षेत्र दर्शवितात. पारंपारिक लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या अनेक बाबी विविध स्वरूपी आहेत. लोकसाहित्याचे क्षेत्र व्यापक असल्याने त्यांच्या सिमा निश्चीत करणे ही एक अत्यंत अवघड बाब आहे. पारंपारिक लोकजीवनातील प्रत्येक बाब की, ज्यामागे लोकमानस आहे, परंपरा आहे. ती लोकसाहित्याच्या क्षेत्रात समाविष्ट होते.

लोकसाहित्याचा हा प्रवाह कित्येकशतकांपासून अखंडपणे वाहत, बदलत्या काळाचे लोकजीवनाचे अंत:प्रवाह आपल्यात सामील करून घेवून वाहत आलेला आहे.

**संदर्भग्रथ**

१. लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह :— शरद व्यवहारे, प्रकाशक—अरूण पारगांवकर, प्रतिमा प्रकाशन १३६२ सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट्स नवा विष्णु चौकाजवळ, पुणे—३०

२. महाराष्ट्रातील समग्र बोलीचा लोकसाहित्यशास्त्रीय अध्यायन – प्रा.डॉ. बापूराव देसाई, अनघा प्रकाशन, १६, श्रीसदिच्छा, मीठबंदर रोड, चेंदणी ठाणे पुर्व–४०० ६०३
३. लोकसाहित्य संकल्पना स्वरूप–डॉ.व्यवहारे, प्रकाशक सदाशिव अतकरे, तिरूपती प्रकाशन, लोकमान्यनगर, परभणी.
४. लोकसाहित्य रंग आणि रेखा–डॉ. शरद व्यवहारे, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. प्रकाशक–आर.बी.सिंह विश्वभारती प्रकाशन, धनवटे चेम्बर्स, सीताबर्डी, नागपुर–४४००१२
५. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने – भागवत विद्‌युत,.प्रकाशक – स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ.
६. स्त्रियांची आत्मचरित्रे –दिशा – पाटील शोभा .
७. स्त्री जीवनाची गुंतागुंत – परदेशी प्रतिमा, भागवत विद्‌युत – .प्रकाशक–स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ.